# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 06 / 11 / 2023

| अ.क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता.वेळ | दाखल.ता.वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अचलपुर 334/2023 कलम 324,34 भा.द.वि. | मोहन उत्तमराव आकोले वय 35 वर्ष रा. बुरूळघाट पो.स्टे. परतवाडा | 1 अमर बाबुलाल खेलापुरे वय 53 वर्ष 2 समीर अमरसिंग खेलापुरे वय 20 वर्ष 3 सुजल अमरे खेलापुरे वय 20 वर्ष तिन्ही रा. बुंदेलपुरा अचलपुर | बुंदेलपुरा अचलपुर | 06/11/2023 चे 09/00 ते 09/30 वा. | 06/11/2023 चे 14/06 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ. ता. वेळी व ठीकानी यातील फिर्यादी हा त्याच्या पत्नीला व मुलाला आणण्याकरिता सासरी गेला असता सासरे यांनी म्हटले की माझे मुलीला पाठवणार नाही तेव्हा मी जाण्यास खुर्ची वरून उठलो असता तेव्हा सासरे यांना वाटले की मला मारण्यास येत आहे ते ओरडले व बाहेरून आरोपी क्र 2 व 3 हे मारण्यास आले आरोपी क्र 2 यांनी माझे डोक्यात लोखंडी रॉड सारखे काहीतरि वस्तु मारली त्यामुळे डोक्यातुन रक्त निघु लागले माझे सासरे व साळे या तिघांनी मारहान केली वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| 2 | शे घाट 416/2023 कलम 337,304 A,भा.द.वि. | संजय उर्फ सलाराम उईके वय 25 वर्ष धंदा मजुरी रा. प्रभात हायस्कूल जवळ पुसला | बैलगाडी चालक वसंत पंधरे रा. रवाळा | गोनापुर चेक पोस्ट चे समोर 5 km उत्तर | 26/10/2023 चे 06/00 ते 6/30 वा. दरम्यान | 06/11/2023 चे 15/43 वा. | हकीकत अश्या प्रकारे आहे की माझा मित्र मृतक कपिल सहदेव युवनाते राहणार वरुड व त्याच्यासोबत त्याचा मित्र राजकुमार धुर्वे अंदाजे 5/00 वा. दरम्यान कपिलने आपण मुलताई येथे माझ्या गर्लफ्रेंडला भेटण्याकरता जाऊ कपिलच्या मोटरसायकलने वरुड वरून मुलताई कडे जाणाऱ्या चक्री घा टात पोचलो असता राजकुमार धुर्वे यांच्या पत्नीचा फोन आल्याने त्याला सोडण्याकरता आम्ही परत वरुडला येत असताना कपिल मोटर सायकल चालवत होता. 05/30 वा. दरम्यान गोणापुर चेक पोस्ट च्या समोर वरुड कडे जात असताना आम्ही आमच्या डाव्या बाजूने रोडने जात असताना रोड समोर एक बैलगाडी दिसली त्या बैलगाडीला हॉर्न दिला आम्ही पुढे जात असताना बैलगाडी चालकाने अचानक त्याची बैलगाडी उजव्या दिशेने रवाळा गावाकडे वळविली कपिल ने गाडी ब्रेक करेपर्यंत आमची मोटरसायकल बैलगाडीला जाऊन धडकली त्यामुळे आम्ही खाली पडलो व कपिलच्या डोक्याला जबर मार लागून रक्त निघत होते व मला उजव्या हाताला डोक्याला मार लागला कपिल बेशुद्ध पडला होता आम्हाला तेथील लोकांनी उचलून ॲम्बुलन्स ने वरुड येथील सरकारी दवाखान्यात भरती केले व डॉक्टर साहेब यांनी कपिल ला तपासणी करून हा मरण पावल्याचे सांगितले वसंता पंधरे राहणार रवाडा यांनी त्यांच्या ताब्यातील बैलगाडी अचानक रवाळा गावाकडे वडविली त्यामुळे आमचा अपघात झाला . व आज रोजी मला बरे वाटत असल्याने.<br>सदर वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील बैलबंडी अचानक वळविली व जबर धडक झाली व आमचा अपघात घडवून आणला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदर चा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण

करीता